तरुण भारत मंगळवार दि. २० डिसेंबर २०२२



नूल : प्रेरणा पुरस्कार एम. एल. चौगुले यांना प्रदान करताना डॉ. आनंद मेणसे, सोबत वसुधाताई पवार यांच्यासह अन्य मान्यवर.

# धार्मिक, जातीयवादी ध्रुवीकरणातून देशातील समता धोक्यात

- कॉ. आनंद मेणसे यांचे प्रतिपादन
- पुष्पावती चौगुले विश्वस्त निधीच्या वतीने पुरस्कारांचे वितरण

वार्ताहर
**नूल**

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये अनेक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक स्थित्यंतरे अनुभवत भारतीय लोकशाही समृद्ध झाली. भाषावर प्रांतरचना त्यातून निर्माण झालेली राज्ये धर्मनिरपेक्षतावादी तत्त्वातून देशात झालेली समता अंगिकारत असताना १९९१ मध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. मात्र आज अमृतमहोत्सवी स्वातंत्र्याचे वर्तमान याची सांगड घालताना देशातील धार्मिक व जातियवादी ध्रुवीकरणातून देशातील समता धोक्यात येत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत डॉ. आनंद मेणसे यांनी केले. नूल येथे पुष्पावती चौगुले विश्वस्त निधीच्या पुरस्कार सोहळ्यात 'भारतीय स्वातंत्र्याची अमृतमहोत्सवी वाटचाल' या विषयावर ते बोलत होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ शीतल वैशंपायन यांच्या गुरूस्तवनातनाने झाला. यावेळी व्यासपीठावर सर्व पुरस्काराचे मानकरी व मान्यवर उपस्थित होते. स्वागत सुरेश चौगुले यांनी केले. यावेळी विश्वस्त निधीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. यावेळी डॉ. आनंद मेणसे यांच्या हस्ते प्रेरणा पुरस्कार रवळनाथ हौसिंग सोसायटीचे संस्थापक–अध्यक्ष एम. एल. चौगुले यांना प्रदान करण्यात आला. भि. आ. चौगुले गुरूजी आदर्श शिक्षक पुरस्कार रविंद्र वीर यांना प्रदान केला. राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय संघटक बाबासाहेब नदाफ शिरोळ यांना कै. दुंडाप्पा चौगुले साथी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. राधाबाई शिंदे आदर्श माता पुरस्कार रंजना जाधव यांना वसुधाताई पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अनिरुद्ध कुलकर्णी जिद्द पुरस्कार प्रकाश सावंत यांना देण्यात आला. सुंदर शाळा पुरस्कार विद्यामंदिर हेब्बाळ व विद्यामंदिर अत्याळ यांना देण्यात आला.

गुणीजन पुरस्कार मारुती चौगुले यांना देण्यात आला. १२ वी कला शाखा प्रथम क्रमांक प्रीती पाटील हिचा गौरव केला. त्याचबरोबर निरंजन पाटील, रणजित यादव, संजय जगदाळे, तेजस्विनी बालेशगोळ, उमेश खोत, रवींद्र गरूड, उमेश खोत, संजय थोरात या विविध क्षेत्रातील कर्तृत्वतांचा सत्कार केला. विश्वस्त शरद चौगुले व गुणवंता चौगुले या दांपत्याचा अमृतमहोत्सवी पदार्पणासाठी विशेष सत्कार करण्यात आला. कोरोना काळात चांगले काम केलेले डॉ. अनिल नेवडे, डॉ. दिलीप मांजरेकर, संजीवनी मांजरेकर, डॉ. अश्विनी शिंदे, डॉ. मनीषा जगदाळे, पोलीस पाटील परशराम सरनाईक यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विश्वस्त निधीचे अध्यक्ष अ. ब. बांदेकर, माजी आमदार श्रीपतराव शिंदे, राजेंद्र गड्यान्नावर, सुरेश शिपूरकर, व्यंकाप्पा भोसले, श्रीकांत चौगुले, नागेश चौगुले, विलास कुलकर्णी, बापूसो शिंदे, विनोद नाईकवाडी, सचिन शिंदे, जयसिंगराव चव्हाण, जितेंद्र शिंदे, विजय चव्हाण, सुभाष निकम, आनंदा पवार, कृष्णाजी सुतार, आप्पाजी काळे, उदय पानारी, शशिकांत जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.